रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ६३
www.ramprahar.com

◆ शनिवार, १९ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

‘आशीर्वादाचा दिवा’तून मोदींचा वाढदिवस साजरा/२
कर्जत तालुक्यात २५९८ गौरींचे पूजन/५
गणेशोत्सव दर्शन छायाचित्रे/३, ६,८

## महाराष्ट्रातील ९९० कोटींच्या रेल्वे प्रकल्पांना मंजुरी



**मुंबई :** महाराष्ट्रातील रेल्वे जाळे मजबूत करण्यासाठी केंद्र सरकारने ९९० कोटींच्या दोन प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. पहिला प्रकल्प ४९७ कोटींचा पनवेल–चौक–कर्जत मार्गावरील चौक ते कर्जत (१०.८६ किमी) दुहेरीकरणाचा आहे. यामुळे रोज दोन्ही बाजूंनी पाच नवीन प्रवासी गाड्या सुरू होणार असून दरवर्षी १८.३५ दशलक्ष टन अतिरिक्त मालवाहतूक क्षमता वाढणार आहे. दुसरा ४९३ कोटींचा प्रकल्प यवतमाळ–चंद्रपूरसाठी मुकुटबन ते गडचांदूर (३८.२१ किमी) नवा मार्ग आहे. यामुळे वर्धा–मानिकगड मार्गावरील ताण कमी होऊन रोज दोन मेमू गाड्या आणि ६.०८ दशलक्ष टन मालवाहतूक शक्य होणार आहे. एकंदरीत या ९९० कोटींच्या गुंतवणुकीमुळे राज्यातील प्रवासी वाहतुकीला गती मिळण्यासोबतच औद्योगिक क्षेत्रातील मालवाहतुकीला मोठा दिलासा मिळणार आहे.

# आज ५१,००० तरुणांचे नशीब उजळणार

## पंतप्रधान मोदी देणार ड्रीम जॉबची नियुक्तिपत्रे



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील तरुण आणि पर्यावरण या दोन्ही क्षेत्रांसाठी शनिवारचा (दि. १९) दिवस महत्त्वाचा ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी दोन महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. यातील पहिल्या कार्यक्रमात देशभरातील ५१ हजारांहून अधिक नव्याने नियुक्त तरुणांना सरकारी नोकरीची नियुक्तिपत्रे दिली जाणार आहेत. पंतप्रधान मोदी शनिवारी दुपारी १२.३० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून ५१ हजारांहून अधिक नव्याने नियुक्त तरुणांना नियुक्तिपत्रे प्रदान करणार आहेत.

यावेळी ते नवनियुक्त कर्मचाऱ्यांना संबोधितही करणार आहेत. हा देशभरात आयोजित करण्यात येणारा २०वा रोजगार मेळावा असून देशातील ४५ विविध ठिकाणी एकाच वेळी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या विविध मंत्रालये आणि विभागांमध्ये या तरुणांची नियुक्ती करण्यात आली आहे. रेल्वे, गृह मंत्रालय, आरोग्य मंत्रालय, संरक्षण मंत्रालय तसेच महसूल आणि वित्तीय सेवा विभागासह विविध सरकारी विभागांमध्ये या नियुक्त्या झाल्या आहेत. या रोजगार मेळाव्यामुळे आतापर्यंत वितरित करण्यात आलेल्या नियुक्तिपत्रांची एकूण संख्या अंदाजे १२.७५ लाखांवर पोहोचणार आहे.

या मेळाव्याच्या माध्यमातून केंद्र सरकार रोजगार निर्मितीच्या दिशेने मोठे पाऊल उचलत आहे. दरम्यान, रोजगार मेळाव्यापूर्वी सकाळी १० वाजता पंतप्रधान मोदी नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे ‘द फ्युचर ऑफ एन्व्हायर्नमेंट अँड क्लायमेट डायनॅमिक्स’ या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करणार आहेत. नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल (NGT)कडून १९ आणि २० सप्टेंबर रोजी या दोन दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. पर्यावरण आणि हवामान बदलाच्या भविष्याशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर या परिषदेत चर्चा होणार आहे.

या परिषदेत जगातील १७ देशांमधील मुख्य न्यायाधीश आणि न्यायिक प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. याशिवाय सर्वोच्च न्यायालय, विविध उच्च न्यायालये आणि जिल्हा न्यायालयांमधील न्यायाधीश, वरिष्ठ सरकारी अधिकारी, विविध मंत्रालयांचे सचिव तसेच पर्यावरण क्षेत्रातील तज्ज्ञांचीही उपस्थिती राहणार आहे. पर्यावरण रक्षण आणि हवामान बदल या जागतिक आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी ही परिषद महत्त्वाची मानली जात आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलच्या रामेश्वर मंदिरात महाआरती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल येथील श्री रामेश्वर महादेव मंदिरात भव्य महाआरतीचे गुरुवारी आयोजन करण्यात आले. यावेळी ‘आशीर्वादाचा दिवा’ प्रज्वलित करून पंतप्रधान मोदी यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व अखंड राष्ट्रसेवेसाठी ऊर्जा लाभो, अशी प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सभापती अजय बहिरा, नगरसेवक सुमित झुंजारराव, गणेश कडू, नगरसेविका प्रीती जॉर्ज, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, उमेश इनामदार, केदार भगत, अभिषेक पटवर्धन, रुपेश नागवेकर, प्रितम म्हात्रे, अमित ओझे यांसह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी रामेश्वर महादेवाचे दर्शन घेत राष्ट्राच्या प्रगतीसाठी प्रार्थना केली.

## जागतिक मंदीतही भारताची भरारी

### ■ विकास दर ७ टक्के राहण्याचा अंदाज




**मुंबई : प्रतिनिधी**

जग आर्थिक संकटात असताना भारतीय अर्थव्यवस्थेला जणू पंख लागले आहेत. युद्धाचा तणाव, महागाई व आर्थिक अनिश्चिततेचे ढग जागतिक बाजारावर दाटले असताना भारताने दणदणीत कामगिरी बजावली. आशियाचे ग्रोथ इंजिन म्हणून भारत भरारी घेत असल्याचा दावा तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे.

जपानमधील संस्थांनंतर आता जागतिक रेटिंग एजन्सी मूडीज रेटिंग्सने भारताच्या आर्थिक विकासाबाबत मोठे भाकीत केले. ताज्या अहवालानुसार आर्थिक वर्ष २०२६–२७साठी भारताच्या विकासदराचा अंदाज ६ टक्क्यांवरून ७ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. देशांतर्गत भक्कम मागणी व पायाभूत सुविधांवरील सरकारी खर्चामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळाल्याचे मूडीजचे आकलन आहे. मोठे संकट सहन करण्याची क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेत असल्याचा दावा संस्थेने केला. मध्य–पूर्वेतील तणावामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांना फटका बसला असून काही अर्थव्यवस्था कोसळण्याच्या मार्गावर आहेत, मात्र भारतावर त्याचा फारसा परिणाम झालेला नाही.





**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे उरणचे आमदार महेश बालदी आणि सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांनी दर्शन घेतले. यावेळी माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर व अन्य मान्यवर उपस्थित होते.**

## निवडक

### दिल्लीत अल्पवयीन मुलीची सामूहिक बलात्कारानंतर हत्या

**नवी दिल्ली :** दिल्लीतील स्वरूपनगर परिसरातील शेतात १६ वर्षीय मुलीचा मृतदेह आढळला. सामूहिक बलात्कारानंतर चाकूने हत्या केल्याचे शवविच्छेदनात स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी ५० सीसीटीव्ही फुटेज आणि संशयित टेम्पोच्या आधारे १९ वर्षीय तरुणासह तीन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले असून दोन चाकू, कपडे जप्त करून पुढील सखोल तपास सुरू केला आहे.

### अग्निवीरांसाठी खूशखबर; सरकारचा मोठा एक्झिट प्लॅन

**नवी दिल्ली :** अग्निवीरांना सरकारकडून मोठी खूशखबर मिळाली आहे. आता अग्निपथ योजनेअंतर्गत चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करून सेवामुक्त होणाऱ्या अग्निवीरांना रोजगार मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारकडून विशेष एक्झिट प्लॅन तयार करण्यात येत आहे. आपला सेवाकाळ संपल्यानंतर रोजगारासाठी भटकंती करण्याची वेळ येऊ नये यासाठीच त्यांच्या पुनर्वसनाची ही महत्त्वाची योजना आखण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या निर्णयामुळे अग्निवीरांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## रायगडात भातशेती बहरली

### पावसाच्या दडीने मात्र बळीराजा चिंतेत



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात आतापर्यंत पाऊस समधानकारक पडल्यामुळे यंदा भातशेती चांगली आहे. कोणत्याही रोगाचा प्रादुर्भाव झालेला नाही, परंतु मागील काही दिवसांपासून पावसाने दडी मारली आहे. आणखी काही दिवस पाऊस पडला नाही तर फळधारणेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत.

रायगड जिल्ह्यात आतापर्यंत एकूण वार्षिक पर्जन्यमानाच्या ८९.९ टक्के पाऊस पडला आहे. जुलै महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला होता. ऑगस्ट महिन्यातदेखील चांगल पाऊस झाला. त्यामुळे भातशेती बहरून आली. शेतकरी आनंदात होता, परंतु सप्टेंबर महिन्याचा सुरुवातीपासून पावसाने दडी मारली आहे. तुरळक पाऊस पडत आहे. सप्टेंबर महिन्याच्या ५६.६ टक्के पाऊस पडला आहे. असे असले तरी अजूनही शेतात पाणी आहे. त्यामुळे भातशेती तग धरून आहे.

रायगड जिल्ह्यात यंदा खरीप हंगामात ९४ लाख हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड करण्यात आली आहे. यंदा जुलै महिन्यात अतिवृष्टी झाली. नंतर मात्र पाऊस समाधानकारक पडला. त्यामुळे यंदा पीक दमदार आल्याने शेतकरीवर्ग खुशीत आहे. भातशेती बहरली असून हळव्या जातीच्या भात रोपांमध्ये फळधारणा सुरू झाली आहे. गरव्या, निमगरव्या जातीची भातेदेखील दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे. अजूनपर्यंत शेतात पाणी आहे, परंतु जर पाऊस अजून एक आठवडा पडला नाही तर फळधारणेवर परिणाम होईल. पाणी नसेल तर त्याचा परिणाम उत्पादनावर होईल. तसेच लष्कर आळीचा प्रादुर्भाव होण्याचा धोका आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत.

रायगड जिल्ह्यात जून, जुलै आणि ऑगस्ट महिन्यांमध्ये चांगला पाऊस पडला. या तीन महिन्यांमध्ये ९८.६ टक्के पावसाची नोंद झाली, परंतु सप्टेंबर महिन्यात पाऊस कमी पडला आहे. सप्टेंबर महिन्याचे तीन आठवडे संपले तरी सप्टेंबर महिन्याच्या सरासरीच्या केवळ ५६.६ टक्के पाऊस झाला आहे. अजून केवळ ११ दिवस उरले आहेत. त्यामुळे सप्टेंबर महिन्यात पावसाची तूट राहणार आहे. त्याचा परिणाम वार्षिक सरासरीवर होईल. यंदा किमान १५ टक्के पावसाची तूट असेल.

## म्हसळ्यात अल्पवयीन मुलीवर पाच जणांकडून अत्याचार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यात १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर पाच जणांनी वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले आहे.

यातील दोन आरोपी अल्पवयीन असल्याची माहिती आहे. पीडित मुलीच्या तक्रारीनुसार तिच्या ओळखीच्या तरुणांनी तिला धमकावून आणि फसवून वारंवार अत्याचार केला तसेच एप्रिल ते जून २०२६दरम्यान पीडितेच्या घराचे बांधकाम करणाऱ्या एका ४० वर्षीय मिस्त्रीने घरात कोणी नसल्याचा गैरफायदा घेत जबरदस्तीने घरात शिरून अत्याचार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी म्हसळा पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

॥ श्री गणेशाय नमः ॥

राम प्रहर




तुमचा लाडका बाप्पा झळकणार ‘दै. रामप्रहर’मध्ये!

गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर दैनिक रामप्रहर घेऊन येत आहे सर्व गणेशभक्तांसाठी एक सुवर्णसंधी!
आपल्या लाडक्या बाप्पाचे मनमोहक रूप आता सगळ्यांना पाहूद्या...
२४ सप्टेंबरपर्यंत घरगुती आणि सार्वजनिक मंडळांच्या गणरायाचे फोटो ‘रामप्रहर’मध्ये विनामूल्य प्रसिद्ध केले जाणार आहेत.

बाप्पाचा फोटो इथे पाठवा
ई–मेल आयडी : ramprahar@gmail.com
व्हॉट्सअॅप क्रमांक : ७७३८१०६००९

फोटोसोबत खालील माहिती नक्की पाठवा
- घरगुती गणपती असल्यास : कुटुंबप्रमुखाचे नाव आणि संपूर्ण पत्ता
- सार्वजनिक गणपती असल्यास : मंडळाचे नाव आणि पत्ता

चला तर मग या गणेशोत्सवात तुमच्या बाप्पाचा सुंदर फोटो आणि माहिती आमच्यापर्यंत पोहचवा आणि आपल्या बाप्पाचे रूप सर्वांपर्यंत घेऊन जा...

दैनिक रामप्रहर : सदैव तुमच्या सोबत!

## उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा!

### पनवेल मनपाचा निर्माल्य संकलन उपक्रम






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने यंदा १० दिवसांच्या गणेशोत्सवकाळात महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा’ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महापालिकेने पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाची संकल्पना राबवत यावर्षीच्या गणेशोत्सवात गणेशमूर्तीच्या विसर्जन ठिकाणी निर्माल्य कलश तसेच सार्वजनिक व घरगुती गणेशोत्सवाचे निर्माल्य संकलित करण्यासाठी निर्माल्यरथाची सुविधा उपलब्ध करून दिली असून नागरिकांचा उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यावर्षीच्या गणेशोत्सवकाळात श्रींच्या मूर्तीसोबत विसर्जनस्थळी आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीच्या गळ्यातील फुलांचे हार, सजावटीचे सामान, पुष्पमाला, फुले, दुर्वा, शमी यांसारखे पुनर्प्रक्रिया करण्यायोग्य निर्माल्य टाकण्यासाठी पालिकेमार्फत प्रत्येक विसर्जन ठिकाणी स्वतंत्र निर्माल्य कलशांची व्यवस्था करण्यात आली आहे.

घरगुती गणेशोत्सवातील आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये दररोज निर्माण होणाऱ्या निर्माल्याचे संकलन करण्यासाठी महापालिकेने चार प्रभाग तसेच नावडे उपविभाग मिळून असे पाच विशेष निर्माल्य संकलन रथ तयार केले आहेत. या निर्माल्यरथांच्या माध्यमातून गणेशोत्सव कालावधीतील निर्माल्य जमा करून ते निर्माल्य प्रक्रिया केंद्रांपर्यंत पोहोचवून त्यावर पर्यावरणपूरक प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती मुख्य स्वच्छता निरीक्षक अरुण कांबळे यांनी दिली आहे.

‘उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा’ उपक्रमांतर्गत भक्तीला, परंपरेला आणि संस्कृतीला पर्यावरणाची साथ देत निसर्गाशी पुन्हा एकदा नाते जोडून पर्यावरणाच्या रक्षणावर पनवेल महानगरपालिका भर देत आहे.

## शालेय समित्या होणार ‘नशाविनाशक’

**मुंबई : प्रतिनिधी**

शाळेच्या गणवेशात पाठीवर दप्तर अडकवून शिकून मोठे होण्यासाठी घराबाहेर पडणारी मुले हळूहळू नशाखोरीच्या छुप्या व जीवघेण्या अंधारात हरवत आहेत. ही गंभीर सामाजिक स्थिती सावरण्यासाठी शासनाने महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय घेत शाळांमधील व्यवस्थापन समित्यांवरच विद्यार्थ्यांच्या नशामुक्तीची मुख्य जबाबदारी सोपवली आहे. यामुळे शाळांच्या व्यवस्थापनात आता मोठा बदल होणार आहे. ज्या टप्प्यावर खेळ व नवी स्वप्ने असायला हवीत, त्याच वयात अमली पदार्थांचे आकर्षण मुलांच्या आयुष्याची धूळधाण करते. शाळा केवळ परीक्षा व गुणांची शर्यत राहणार नाही, तर मुलाला सावरणारी व व्यसनांच्या विळख्यातून बाहेर काढणारी सुरक्षा ढाल होण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित होण्यास मदत होणार आहे.

# औद्योगिक कारणासाठी घेऊन वापर होत नसलेल्या जमिनी शासनजमा करण्याची कार्यवाही सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

औद्योगिक आणि क्लस्टर विकासासाठी घेतलेल्या मात्र वापरा विना असलेल्या जमिनी शासनजमा करण्याची कार्यवाही रायगड जिल्हा प्रशासनाने सुरू केली आहे. जिल्ह्यातील २११ कंपन्यांकडे असलेल्या १ हजार ५७० हेक्टर जमिनी ताब्यात घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालायाने सुरू केली आहे. या कंपन्यांना महसूल विभागाने महाराष्ट्र कुळवहीवाट आणि शेतजमिन अधिनियमा अंतर्गत नोटीसा जारी केल्या आहेत.

राज्याचा औद्योगिक जिल्हा म्हणून ओळख असलेल्या रायगड जिल्ह्यात अनेक गुंतवणूकदार कंपन्या औद्योगिकरणाच्या नावाखाली जिल्ह्यातील शेतजमिनी संपादीत करत आहेत. मात्र नंतर त्यावर उद्योग न उभारता त्या जागा तशाच पडून राहत आहेत.औद्योगिक आणि क्लस्टर विकासासाठी घेतलेल्या मात्र वापरा विना असलेल्या जमिनींचे सर्वेक्षण करून त्या शासन जमा करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काही दिवसांपूर्वी जिल्हा प्रशासनाला दिले होते. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने कार्यवाही सुरु केली आहे.

महाराष्ट्र कुळवहीवाट आणि शेतजमिन अधिनियम १९४८ च्या कमल ६३ (एफ) (अ) प्रमाणे जिल्हातील १५ तालुक्यामधील ५ हजार २४० हेक्टर जमिनी ६६६ कंपन्यांकडून संपादीत करण्यात आल्या होत्या. मात्र यातील २११ कंपन्यांनी जमिनी संपादीत केल्या पासून पंधरा वर्षात त्या जमिनींचा वापर केलेला नाही. त्यावर उद्योगही उभारलेला नाही. त्यामुळे वापराविना पडून आहे. या २११ कंपन्याकडील १ हजार ५७० हेक्टर जमिनी ताब्यात घेण्याची प्रक्रीया जिल्हाधिकारी कार्यालायाने सुरू केली आहे. त्यासाठी या २११ कंपन्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. या कंपन्यांच्या प्रतिनिधींना आवश्यक कागदपत्रासह अप्पर जिल्हाधिकारी यांच्या समोर हजर राहण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

**महसूल विभागाकडून २११ कंपन्यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. त्यांना सुनावणी करीता हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या कंपन्या अनुपस्थित राहतील आणि ज्यांनी जमीन धारण करण्यास शासनाने निर्धारीत केलेला कालावधी पुर्ण केला असेल, अशा सर्व जमिनी शासन जमा करण्याची कारवाई केली जाईल.**
**– सचिन ढोले,** अप्पर जिल्हाधिकारी रायगड

# करंजाडेत ‘आशीर्वादाचा दिवा’ उपक्रमातून मोदींचा वाढदिवस साजरा

**पनवेल : वार्ताहर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त करंजाडे येथे भारतीय जनता पक्ष आणि लोकनियुक्त सरपंच मंगेश शेलार यांच्या नेतृत्वाखाली ‘आशीर्वादाचा दिवा’ उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भाजप कार्यालय, गणेश मंदिर तसेच नागरिकांनी घरांसमोर दिवे प्रज्वलित करून वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.



पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वासकर, कुंडेवहाळचे सरपंच सदाशिव वास्कर, युवा नेते अनुज जितेकर, लोकनियुक्त सरपंच मंगेशदादा शेलार आणि उपसरपंच सागरभाई आंग्रे यांच्या हस्ते पहिला ‘आशीर्वादाचा दिवा’ प्रज्वलित करण्यात आला. त्यानंतर गणेश मंदिर परिसरात भाजप कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी प्रथमेश पुंडे, कैलास शेलार आणि राम महाडिक यांनी पंतप्रधान मोदी यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांच्या दीर्घायुष्यासाठी हा उपक्रम आयोजित केल्याचे सांगितले. या उपक्रमाला महिला व युवकांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.

# खराब हवामानामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हेलिकॉप्टर महाडमध्ये उतरले

**महाड : प्रतिनिधी**

हेलिकॉप्टरने दरेगावकडे जात असताना महाबळेश्वर परिसरातील प्रतिकूल हवामानामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रवासात अचानक बदल करावा लागला. दाट धुके आणि वाढलेल्या वाऱ्याचा वेग लक्षात घेऊन सुरक्षेच्या कारणास्तव त्यांचे हेलिकॉप्टर गुरुवारी सायंकाळी महाड येथील हेलिपॅडवर उतरविण्यात आले. त्यानंतर शिंदे यांनी रस्तेमार्गे दरेगावकडे प्रस्थान केले.




उपमुख्यमंत्री शिंदे यांचे हेलिकॉप्टर महाडमध्ये उतरल्यानंतर शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी शिंदे यांच्या स्वागतासाठी हेलिपॅडवर उपस्थित होते. यावेळी विद्यमान जिल्हा परिषद सदस्य विकास गोगावले यांनी हेलिपॅडवर उपस्थित राहून शिंदे यांचे स्वागत केले. हवामानाची परिस्थिती पाहता पुढील प्रवास रस्तेमार्गे करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर विकास गोगावले यांच्या वाहन ताफ्यातून शिंदे दरेगावच्या दिशेने रवाना झाले. विशेष म्हणजे, विकास गोगावले यांनी स्वतः वाहन चालवत या ताफ्याचे सारथ्य केले. महाड ते दरेगाव या मार्गावर ठिकठिकाणी स्थानिक शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे स्वागत केले.

दरेगाव येथे पोहोचल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी असलेल्या घरगुती गणपतीचे विकास गोगावले यांनी दर्शन घेतले.दरम्यान, खराब हवामानामुळे प्रवासाच्या नियोजनात अचानक बदल झाल्याने पोलीस विभागाने तातडीने सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन केले. त्यानुसार उपमुख्यमंत्री शिंदे यांचा पुढील रस्तेप्रवास सुरक्षितपणे पार पडला.

# गांधार पाले ग्रामपंचायतीच्या कचऱ्यामुळे सावित्री नदी प्रदूषणाच्या विळख्यात

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहराला लागून असणाऱ्या गांधार पाले ग्रामपंचायतीकडे डम्पिंग ग्राउंड साठी जागा नसल्यामुळे ग्रामपंचायत मार्फत गोळा केला जाणारा कचरा थेट महानगर परिषद हद्दीमधील गांधार पाले ब्रिज ते केभुर्ली (मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग कडे जाणारा) सर्विस रोडवर सावित्री नदीपात्रालग टाकल्याने सावित्री नदी प्रदूषणाच्या विळख्यात अडकल्याने सावित्री नदीमधील मासे व मगरींच्या या कचऱ्याच्या प्रदूषणामुळे त्यांच्या उत्पत्ती वाढ होत नसल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे?



महाड नगरपालिकेच्या हद्दीला लागूनच गांधार पाले ग्रामपंचायतीची हद्द आहे गांधार पाले ग्रामपंचायत हद्दीतून महाड शहराकडे सर्विस रोड येतो या सर्विस रोडला लागूनच गांधारी नदीचा जुना ब्रिटिशकालीन पूल आहे या पुलापासून केभुर्ली गावाकडे जाणारा रस्ता आहे पूर्वी हा रस्ता रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे होता .

मात्र या रस्त्यावर पडणाऱ्या मोठ्या प्रमाणातील खड्ड्यांमुळे हा रस्ता स्थानिक ग्रामस्थांनी महाड नगर परिषदेकडे आवाज उठवल्यानंतर तो रस्ता महाड नगर परिषदेने आपल्याख्यारीत घेतला आता सध्या या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट करण्याचे काम युद्धपातळीवर चालू आहे.

गांधारी पूल ते केभुर्ली ग्रामपंचायत हद्द( मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६) च्या मुख्य रस्त्यापर्यंत हा रस्ता स्थानिक ग्रामस्थांच्या सोयीसाठी उपलब्ध आहे याच रस्त्यावरून पूर्वी महाड शहरातून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाला जाणारी वाहने ये जा करीत होती. सध्या या रस्त्याला लागूनच सावित्री नदीचे मुख्य पात्र आहे या सावित्री नदीच्या मुख्य पात्रालगतच रात्रीच्या वेळेस व पहाटेच्या वेळेस गांधार पाले ग्रामपंचायत हद्दीतील कचरा मोठ्या प्रमाणावर सावित्री नदी पात्रालगत टाकत असल्याने सावित्री नदी प्रदूषित झाली आहे. परंतु या कचऱ्याच्या ढिगांमुळे महाड शहरातून केभुर्ली गावातील जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना शालेय विद्यार्थ्यांना या कचऱ्याच्या दुर्गंधीचा मोठ्या प्रमाणावर नाहक त्रास होत आहे

महाड नगरपरिषदेच्या आख्यातारीत असणाऱ्या या रस्त्यावर गांधार पाले ग्रामपंचायत विनापरवाना टाकत असलेल्या कचऱ्यावर महाड नगरपरिषद कोणतीही कारवाई करीत नसल्याने मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरत आहेत परंतु सावित्री नदी प्रदूषणाला हातभार लावण्याचे काम गांधार पाले, ग्रामपंचायत करीत असताना प्रदूषण नियंत्रण मंडळ मात्र झोपी गेल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे.

# माहेरवाशीण गौराईचे घरोघरी भक्तिभावाने पूजन

**नवी मुंबई : बातमीदार**

गणरायाच्या आगमनानंतर माहेरवाशीण म्हणून घरी येणाऱ्या गौराईच्या पूजनाचा सोहळा शुक्रवारी (ता. १८) नवी मुंबई, रायगडसह परिसरातील स्थानिक गाव–गावठाणांत मोठ्या भक्तिभावाने पार पडला. गौराईच्या आगमनापासूनच घराघरांत आनंदाचे वातावरण असून, आजच्या पूजनासाठी महिलांनी सकाळपासूनच तयारीला सुरुवात केली होती. गौराईच्या पाहुणचारासाठी विविध प्रकारचे गोडधोड पदार्थ, पारंपरिक नैवेद्य आणि पंचपक्वान्न तयार करण्यात आले.

गौराईचे पूजन पारंपरिक पद्धतीने करण्यासाठी महिलांनी पहाटेपासून घराची स्वच्छता, सजावट आणि पूजेची तयारी केली. आकर्षक फुलांची सजावट, लखलखीत दागदागिने, मोत्याची नथ आणि पारंपरिक कोळी वेशभूषेतील गौराईचे मनोहारी रूप घराघरांत पाहायला मिळाले. सुहासिनींनी गौराईचे औक्षण करून तिची मनोभावे पूजा केली. माहेरवाशीण आलेल्या गौराईचा पाहुणचार अगदी आपल्या लेकीप्रमाणे करण्याची भावना प्रत्येक घरात दिसून आली.



गौराईच्या पूजनानिमित्त घराघरांत विविध प्रकारचे गोडधोड पदार्थ तयार करण्यात आले. पुरणपोळी, खीर, लाडू, करंज्या, मोदक तसेच विविध पारंपरिक पदार्थांचा नैवेद्य गौराईला दाखविण्यात आला. कुटुंबातील महिलांसह लहान–मोठ्यांनी या सोहळ्यात उत्साहाने सहभाग घेतल्याने घराघरांत भक्तीमय आणि प्रसन्न वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, अनेक गाव–गावठाणांत गौराईभोवती पारंपरिक फेऱ्या धरत महिलांनी जुन्या लोकगीतांचे सूर आळवले. ‘सरला श्रावण भादवा, आला गौराई माझी गेली पाण्याला...’, ‘सुपली सोन्याची...’ अशा पारंपरिक गाण्यांनी परिसर दुमदुमून गेला. ढोलाच्या तालावर रंगणाऱ्या फेऱ्या आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे आगरी–कोळी समाजाच्या समृद्ध लोकपरंपरेची ओळख असल्याचे मीनाक्षी रमेश बोस यांनी यावेळी सांगितले.

**ओवशातून जपली जाते सांस्कृतिक परंपरा**

गौराईच्या पूजनासोबतच अनेक ठिकाणी ओवशाची पारंपरिक पद्धतही श्रद्धेने पार पाडण्यात आली. पाच प्रकारच्या भाज्या, वेलींची पाने, फळे, करंडा–फणी, खण–नारळाची ओटी आणि सुटे पैसे अशा साहित्याने भरलेली पाच सुपे गौराईसमोर ठेवून सुहासिनींनी विधिवत पूजा केली. त्यानंतर गौराईसमोर सूप तीन वेळा वर–खाली फिरवून ओवसा भरण्याची परंपरा पार पडली.

# सुरीचा धाक दाखवून तरुणाची सोन्याची चेन लुटली

**पनवेल : वार्ताहर**

सुरीचा धाक दाखवून तरुणाच्या गळ्यातील सुमारे १ लाख रुपये किमतीची सोन्याची चेन चौघा लुटारूंनी जबरदस्तीने लुटून नेल्याची घटना नवी मुंबई विमानतळासमोरील उलवे–चिंचपाडा मार्गावर घडली. या प्रकरणी विमानतळ पोलिसांनी अज्ञात चौघांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार धीरज विलास मुंडे (२४) हा पनवेल येथे राहतो. तो सीवूड्स येथील क्रोमा शोरूममध्ये काम करतो. कामावरून सुटल्यानंतर धीरज दुचाकीवरून विमानतळासमोरील रस्त्याने पनवेलकडे घरी जात होता.वाधिवली प्रवेशद्वाराजवळ मोटारसायकलवरून आलेल्या चौघांनी विमानतळाचा पत्ता विचारण्याच्या बहाण्याने धीरजला रस्त्यात अडवले. तो काही बोलण्यापूर्वीच त्यातील एका लुटारूने सुरीचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर चौघांनी धीरजच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची सुमारे १ लाख रुपये किमतीची सोन्याची चेन जबरदस्तीने काढून घेतली.

लूट केल्यानंतर चौघेही दुचाकीवरून उलवेच्या दिशेने पसार झाले. या घटनेनंतर धीरज मुंडे याने विमानतळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# करुणेश्वर ओल्ड एज केअर हाऊस मध्ये स्नेहभोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भानघर येथील करुणेश्वर ओल्ड एज केअर हाऊस येथे ज्येष्ठ नागरिकांसोबत स्नेहभोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून ज्येष्ठ नागरिकांप्रती आदर, सन्मान आणि कृतज्ञता व्यक्त करण्यात आला.



या कार्यक्रमात हितेश शाह, राजेश शाह, अजित भिंडे, राजेश पटेल, चेतन मेहता, साधना शेट्ये, अश्विनी शेट्ये, ईश्वर धोरे, करुणा धोरे आणि संतोष धोरे यांच्यासह करुणेश्वर ओल्ड एज केअर हाऊस परिवाराने सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान ज्येष्ठ नागरिकांसोबत संवाद साधत त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी दीप प्रज्वलन करून प्रार्थना करण्यात आली.

स्नेहभोजनाच्या माध्यमातून वृद्धांना आपुलकीची भावना देण्याचा प्रयत्न केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे मार्गदर्शक असल्याचे सांगितले. ज्येष्ठांच्या आशीर्वादातून राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा मिळते, असेही मत व्यक्त करण्यात आले.

# हात सोडून डोक्यावर तोल सांभाळत नाचवली जाणारी गौराई

## वाशी, वढाव, भाल विभागातील खारेपाटातील अनोखी परंपरा

**पेण : प्रतिनिधी**

डोक्यावर ठेवलेला गौरीचा पाट, दोन्ही हात पूर्णपणे सोडलेले आणि भजनाच्या तालावर लीलया चिखलातून व शिडीवरून तोल सांभाळत चालणारी पावले... पेणच्या खारपाटातील महिलांच्या या अद्भूत कौशल्याने आणि परंपरेने यंदाचा गौराई उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे.

गणेश आगमनानंतर येणाऱ्या या गौराईच्या उत्सवात निसर्गाशी जोडलेले नाते आणि महिलांचे हे अनोखे वैशिष्ट्य सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. पेण व खारपाट भागात गौराईसाठी शाडूची मूर्ती वापरली जात नाही. त्याऐवजी तेरड्याची रोपे, अमिशिखा (नागवेल) आणि जंगलातील 'भेंड्याच' पिवळी फुले वापरून गौराई साकारली जाते. या नैसर्गिक वनस्पतींनाच 'गौरीची पत्री' मानले जाते. या सर्व वनस्पती औषधी गुणधर्मांनी युक्त असून या दिवसांत गौराईला 'कवला' या वनस्पतीची भाजी विशेष आवडते, अशी लोकधारणा आहे.



गौरीच्या आगमनानंतर या भागात भजने, भवर नाच, रामायण–महाभारतावर आधारित गाणी, तसेच लोकगीते गायली जातात. महिला फुगड्या, झिम्मा, कोंबडा यांसारखे पारंपारिक खेळ खेळतात, तर पुरुष नाच व उखाणे सादर करून या उत्सवाचा आनंद द्विगुणीत करतात. या उत्सवात महिलांच्या तोल सांभाळण्याच्या कौशल्याचा सुरेख संगम पाहायला मिळतो. भाल येथील सरोज अशोक म्हात्रे शेतातील चिखलातून दोन्ही हात सोडून दीड तास डोक्यावरील गौरीचा तोल सांभाळत नाचवतात. तसेच स्त्रिया गौरीच्या पाटाला हात न लावता, शिडीच्या ३ ते ४ पायऱ्या डोक्यावरील गौरीसह चढतात व उतरतात.

वढावमधील शकुंतला म्हात्रे, अहिल्या म्हात्रे, वाशीच्या संगीता पाटील, फणसडोंगरी–पेण येथील रंजना राम म्हात्रे आणि सापोलीतील हरिश्चंद्र म्हात्रे हे गौरी नाचवण्यासाठी प्रसिद्ध आहेत. तांबडशेत, हमरापूर, कांदळे येथेही डोक्यावर गौरी नाचवली जाते, तर रेवदंडा येथील गौरी 'उभ्या गौरी' म्हणून प्रसिद्ध असून त्यांना बांबूच्या कांबटीचा आधार दिला जातो. गौराई ही सासरहून माहेराला केवळ दीड दिवसाच्या पाहुणचारासाठी येते. गौरीच्या आगमनानंतर तिचे पूजन, आरती आणि नैवेद्य अर्पण केला जातो. दुसऱ्या दिवशी विसर्जन करताना महिला पाटाला हात न लावता भजनाच्या तालावर नाचत विसर्जनासाठी नेतात. काही ठिकाणी स्त्रिया स्वतः पाण्यात उतरून गौरीचे विसर्जन करतात. आपल्या माहेरवाशिणीचे प्रेमाने स्वागत करणारा आणि निसर्गाचे महत्त्व जपणारा हा खारेपाटातील गौराईचा उत्सव अत्यंत आनंदात व उत्साहात साजरा होत असतो.

# नवी मुंबईत 'एक दिवा आशीर्वादासाठी'

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या माध्यमातून तसेच नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांच्या जनजागृतीसाठी ‘एक दिवा आशीर्वादाचा’ या उपक्रमांतर्गत बेलापूर मेट्रो रेल्वे स्थानकाबाहेर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश ज. पाटील यांच्या हस्ते दिवा प्रज्वलित करून करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पार्टी नवी मुंबईजिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, नगरसेविका सौ. सुरेखा नरबागे, समाजसेवक अशोक नरबागे, मंडळ अध्यक्ष अजय सिंह, प्रभारी जयवंत तांडेल, कोकण विभागीय कार्यालयीन प्रमुख अभिजित पेडणेकर, मंडळ अध्यक्ष कुणाल महाडिक, मनेष बिजलानी, गोपाळराव गायकवाड, विष्णू भिरूड, दीपक जोशी, अनिल अग्निहोत्री, दीपक पंजवानी, दीपेश पाटील, भूषण कोळी सर्व भाजपा सीबीडी बेलापूर मंडळचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेल गुन्हे शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी औदुंबर पाटील



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत पनवेल गुन्हे शाखा ३ च्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदाचा पदभार औदुंबर पाटील यांनी स्वीकारल्यानिमित्त सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी यांच्या वतीने त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

संपादकीय

# वेगाने उपाययोजना

राज्यामध्ये दुष्काळजन्य परिस्थिती असून सरकारने शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी शिताफीने पावले उचलली आहेत. पाणीटंचाई निर्माण होऊ नये म्हणूनही उपाययोजना केली जात आहे.

**केंद्र सरकारने यंदाच्या मोसमी पावसातील अनिश्चिततेचा अंदाज सुरुवातीपासूनच घेतला होता. सप्टेंबरच्या मध्यापर्यंत देशातील एकूण पर्जन्यमान दीर्घकालीन सरासरीपेक्षा सुमारे १५ टक्के कमी राहिले असून परिणामी शेती, जलसाठे आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबत चिंता वाढली आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची मोठी तूट आहे. पावसाचा खंड पडल्यामुळे खरीप पिकांवर परिणाम झाला आहे. मराठवाड्यासह राज्याच्या विविध भागांत पिके आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता याबाबत चिंता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे दौऱ्यावर जाणार आहेत. सरकारने आतापासूनच पंचनाम्यांची तयारी सुरू केली आहे. एनडीआरएफची मदत मिळतेच. परंतु त्यापूर्वी राज्य सरकार मदत पुरवील अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. अपुऱ्या पावसामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून केली आहे. दरम्यान, मराठवाड्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी सरकारकडून नियोजन केले जात आहे. चाऱ्याच्या टंचाईची शक्यता ध्यानात घेऊन सरकारने वैरण विकास कार्यक्रमाअंतर्गत चारा लागवडीवरही भर दिला आहे. टंचाईग्रस्त ठरू शकणाऱ्या गावांची यादी तयार केली जात आहे. जलस्रोतांचे संरक्षण आणि उपलब्ध स्रोत अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे. सरकारने आवश्यक ती प्राथमिक मदत आणि टंचाई निवारणाची तयारी सुरू ठेवण्याचे स्पष्ट केले आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे आदेशही प्रशासनाला देण्यात आले आहेत. दुष्काळ ही जलव्यवस्थापनाची परीक्षा असते. पाऊस किती पडतो हे आपल्या हातात नसले, तरी उपलब्ध पाण्याचे नियोजन, जलसाठ्यांचे संरक्षण आणि शेतकऱ्यांना योग्य वेळी पर्यायांचे मार्गदर्शन करणे नक्कीच आपल्या हातात आहे. 'एल निनो'च्या प्रभावामुळे यंदाचा मोसमी पाऊस गेल्या अनेक वर्षांतील सर्वात कमकुवत ठरण्याची शक्यता आहे. अर्थात अशी परिस्थिती निर्माण होण्याची वाट पाहत सरकार हातावर हात ठेवून बसलेले नाही. भारतीय हवामान विभागाकडून पावसाचे सातत्याने निरीक्षण केले जात आहे तर निरनिराळ्या राज्य सरकारांच्या समन्वयातून संभाव्य परिणामांचा आढावा घेतला जात आहे. कमी पावसातून उद्‌भवणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी जिल्हानिहाय कृषी आकस्मिक आराखडे तयार करण्यात आले आहेत. कमी पाण्यात येणारी, अल्प मुदतीची पिके, पीक विविधीकरण, सूक्ष्म सिंचन, आंतरपीक पद्धती आणि जलसंधारण यावर भर देण्यात आला आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याच्या दृष्टीने केंद्राने जलसंधारणाच्या कामांना वेग देण्यावरही भर दिला आहे. शेततळी, बंधारे, नाले, जलसाठे आणि भूजल पुनर्भरणाच्या कामांना प्रोत्साहन देतानाच उपलब्ध जलसाठ्याचा अधिक कार्यक्षम वापर करण्याच्या सूचना राज्यांना देण्यात आल्या आहेत. अशा उपाययोजनांचा उद्देश केवळ यंदाचा दुष्काळी ताण कमी करणे नसून, भविष्यातील पाणीसुरक्षेची पायाभरणी करणे हाही आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी सुरू केलेली पूर्वतयारी वेळेत आणि परिणामकारकपणे जमिनीवर उतरली, तर पावसाची कमतरता संकटात रूपांतरित होण्यापूर्वी त्याचा प्रभाव कमी करता येऊ शकेल. आज गरज आहे ती राजकारणापेक्षा पाण्याचे नियोजन करण्याची आणि प्रत्येक थेंबाच्या संवर्धनाची.**

# सेवा संकल्पातून लोकाभिमुख प्रशासन

'सेवा परमो धर्मः' ही केवळ एक उक्ती नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची भावना आहे. शासनाच्या योजना तयार होतात, निर्णय घेतले जातात; मात्र त्यांचा खरा अर्थ तेव्हा अधोरेखित होतो, जेव्हा त्या योजनांचा लाभ गावातील सामान्य कुटुंबापर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत, महिलांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत आणि गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचतो. प्रशासन १७ सप्टेंबरपासून अशाच एका लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सज्ज झाले आहे.केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने त्यांच्या कार्यकाळात 'सेवा परमो धर्मः' या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे.



हे अभियान म्हणजे केवळ कार्यक्रमांची मालिका नाही, तर सरकारी सेवा आणि योजना सामान्य माणसाच्या अधिक जवळ नेण्याचा प्रयत्न आहे.गावातील एखाद्या नागरिकाला प्रमाणपत्र हवे असते, शेतकऱ्याला जमिनीची नोंद अद्ययावत करायची असते किंवा एखाद्या कुटुंबाला सरकारी योजनेचा लाभ घ्यायचा असतो. अशा वेळी अनेकदा विविध कार्यालयांमध्ये जावे लागते. सेवा संकल्प अभियानात ही प्रक्रिया शक्य तितकी सोपी करण्यावर भर देण्यात आला आहे. प्रत्येक तालुक्यात 'सेवा सेतू' शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ पात्र नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. म्हणजेच अनेक सेवा एकाच ठिकाणी मिळण्याची सुविधा निर्माण होणार आहे.या शिबिरांमध्ये फेरफार नोंदींचा निपटारा, स्वामित्व सनद, शेतपाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, वनहक्क दावे, नळजोडणी, वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ आणि ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासारख्या सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सोप्या भाषेत सांगायचे तर ज्या सेवेसाठी नागरिकाला वारंवार कार्यालयात जावे लागते, ती सेवा शक्य तितकी त्याच्या जवळ नेण्याचा प्रयत्न या अभियानातून होणार आहे.या अभियानाचा विशेष भर ग्रामीण भागावर आहे. प्रत्येक गावात आणि वॉर्डात स्थानिक गरजेनुसार 'सेवा माझे योगदान' उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना यात सहभागी करून घेतले जाणार आहे. गाव स्वच्छ ठेवणे, नदीघाट आणि बारवांची स्वच्छता, वृक्षारोपण, रक्तदान, आरोग्य तपासणी शिबिर, प्लास्टिकमुक्तीची जनजागृती, जलसंधारण, कचऱ्याचे वर्गीकरण, रस्ते सुरक्षेबाबत जागृती अशा अनेक उपक्रमांना या माध्यमातून चालना मिळणार आहे. याचा अर्थ एकच, शासनाची सेवा आणि समाजाचा सहभाग एकत्र आला, तर गावाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जमीन आणि महसूल विषयक कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. फेरफार नोंदी, ७/१२, ८-अ, स्वामित्व सनद, वनहक्क दावे यांसारख्या बाबी अनेकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेल्या आहेत. वनहक्क दाव्यांच्या बाबतीत नवीन दावे स्वीकारणे, जुन्या दाव्यांमधील दुरुस्ती करणे आणि पात्र दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अभियानाच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. लहान मुले आणि त्यांच्या मातांसाठीही या अभियानांतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत. 'अंगणवाडी उत्सव' अंतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करून महिलांना आरोग्य आणि पोषणविषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम, फळे व मिठाईचे वाटप आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याची तरतूद आहे.आज ग्रामीण भागातील तरुणांकडे अनेक चांगल्या कल्पना आहेत. शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत ते नवे प्रयोग करू शकतात.

योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाले, तर या कल्पना मोठ्या बदलाचे कारण ठरू शकतात. सेवा संकल्प अभियानात राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स आणि ग्रामीण भागात नवे प्रभावी उपाय विकसित करणाऱ्या व्यक्तींना जोडण्यासाठी 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क, इन्क्युबेशन सेंटर आणि खासगी कंपन्यांचाही सहभाग घेतला जाणार आहे.देशाचे भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही या अभियानाशी जोडण्यात आले आहे. 'विकसित भारत' आणि 'मुलांच्या स्वप्नातील भारत' या विषयांवर चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे, त्यामुळे विकसित भारताची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा हा प्रयत्न आहे.शासकीय योजनेचा लाभ मिळालेल्या नागरिकाच्या घरापर्यंत जाऊन 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्याचा उपक्रमही या अभियानात आहे. सरकारची योजना कागदावर असते; पण तिचा लाभ जेव्हा एखाद्या कुटुंबाच्या घरात पोहोचतो, तेव्हा त्या योजनेला खरा अर्थ प्राप्त होतो.

एखाद्या शेतकऱ्याला योजनेचा लाभ मिळाल्याने शेतीत बदल झाला, एखाद्या महिलेला बचत गटामुळे आर्थिक आधार मिळाला, तर ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट राहत नाही, ती इतरांसाठीही प्रेरणा बनते.म्हणूनच 'बदलाची गोष्ट' या उपक्रमातून विविध योजनांमुळे नागरिकांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल त्यांच्या स्वतःच्या शब्दांत समाजासमोर आणला जाणार आहे. त्यांच्या अनुभवांचे व्हिडिओ आणि रील्सच्या माध्यमातून संकलन करण्यात येणार आहे. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवाद व लोकसहभाग वाढविणारे हे अभियान ठरणार आहे.

**- प्रवीण टाके,**
उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

## बदलते तंत्रज्ञान

# तुमचा मोबाईल फोन असली आहे का?

आजचा बाजार सर्व प्रकारच्या उत्पादनांच्या पहिल्या प्रतींनी भरलेला आहे. ब्रँडेड शूज असोत, कपडे असोत, घड्याळे असोत, सौंदर्यप्रसाधने असोत, इअरबड्स असोत, म्युझिक सिस्टम असोत आणि अगदी स्मार्टफोन असोत, त्याच्या प्रती विकल्या जातात.



ही उत्पादने अगदी मूळ उत्पादनांसारखी दिसतात, परंतु गुणवत्ता, टिकाऊपणा आणि सुरक्षिततेच्या बाबतीत ती मूळ उत्पादनांच्या जवळपासही नाहीत. बऱ्याच वेळा मोठ्या ब्रँडच्या नावाखाली ग्राहकांना फसवले जाते आणि त्यांना बनावट उत्पादने मिळतात.अशा बनावट उत्पादनांमुळे केवळ पैशाचे नुकसान होत नाही तर सुरक्षेवरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे बाजारात खरेदी करताना खरे आणि बनावट ओळखणे खूप महत्वाचे आहे.

बनावट फोनला बळी पडू नये म्हणून मोबाईल खरेदी करताना काही आवश्यक खबरदारी घेणे खूप महत्वाचे आहे. सर्वप्रथम, नेहमी ब्रँडेड स्टोअर किंवा विश्वासार्ह ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून फोन खरेदी करण्याचा प्रयत्न करा.जर तुम्हाला कुठेतरी खूप स्वस्त डील दिसली तर त्यावर लगेच विश्वास ठेवू नका, कारण अशा डीलमध्ये अनेकदा बनावट किंवा नूतनीकरण केलेले फोन विकले जातात. खरेदी करताना पॅकिंग, सील आणि बिल नीट तपासायला विसरू नका.फोन चालू करा आणि सेटिंग्जमध्ये जाऊन IMEI आणि मॉडेल नंबर तपासा आणि अधिकृत पोर्टलवर त्याची पडताळणी करा. त्याच वेळी, जर तुम्ही ऑनलाइन खरेदी करत असाल तर ग्राहकांचे पुनरावलोकने आणि विक्रेत्यांचे रेटिंग नक्कीच तपासा जेणेकरून नंतर कोणतीही समस्या येणार नाही.खरा आणि खोटा मोबाईल ओळखण्याचे अनेक मार्ग आहेत. सर्वात सोपा मार्ग म्हणजे खचएख नंबर तपासणे. प्रत्येक खऱ्या फोनचा एक अद्वितीय खचएख नंबर असतो जो तुम्ही *०६ डायल करून तपासू शकता.

तुम्ही सरकारी साइटवर किंवा ब्रँडच्या वेबसाइटवर हा नंबर सत्यापित करू शकता. याशिवाय बनावट फोनची डिस्प्ले क्वालिटी, कॅमेरा रिझोल्यूशन आणि बॅटरी परफॉर्मन्स लवकर खराब होते, तर मूळ फोन जास्त काळ टिकतो. बिल आणि वॉरंटी हे तुम्ही खऱ्या आणि अधिकृत डीलरकडून फोन खरेदी केल्याचा पुरावा आहे. बनावट किंवा पहिल्या प्रतीच्या फोनमध्ये सहसा खरे वॉरंटी कार्ड नसते.

# भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स

नासा अर्थात अमेरिकन अंतराळ संशोधन संस्थेच्या माध्यमातून अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या दुसऱ्या महिला सुनीता विल्यम्स यांचा आज जन्मदिवस आहे. त्यांचा जन्म १९ सप्टेंबर १९६५ रोजी युक्लिड, अमेरिका येथे झाला होता. त्यांनी महिला अंतराळवीर म्हणून १९५ दिवस अंतराळात राहण्याचा विक्रमदेखील केला आहे.



निमित्त

मेसेच्युसेट्स येथून शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर सुनिता विल्यम्स यांनी १९८८मध्ये संयुक्त राष्ट्राच्या नौदल अकॅडमीमधून फिकिल सायन्समध्ये पदवी घेतली. त्यानंतर १९९५मध्ये फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीतून इंजिनिअर मॅनेजमेंटमध्ये एमएस केले. त्यांचे वडील दीपक पांड्या हे प्रसिद्ध डॉक्टर आहेत. ते गुजरातचे आहेत. त्यांच्या वडिलांनी १९५८मध्ये अमेरिकेत जाण्याचा निर्णय घेतला होता.


जून १९९८मध्ये सुनीता यांची नासामध्ये निवड झाली आणि प्रशिक्षण सुरू झाले. त्यांनी आतापर्यंत ३० वेगवेगळ्या अंतराळयानांमध्ये २७७० वेळा भरारी घेतली आहे. सप्टेंबर २००७मध्ये त्यांनी भारत दौरादेखील केला होता. सुनीता या सोसाइटी ऑफ एक्सपेरिमेंटल टेस्ट पायलेट्स, सोसाइटी ऑफ फ्लाइट टेस्ट इंजिनिअर्स आणि अमेरिकी हॅलिकॉप्टर असोसिएशन या संस्थांशी देखील जोडलेल्या आहे.

सुनीता यांचा विवाह मायकल जे विलियम्स यांच्याशी झाला असून तेदेखील अंतराळ क्षेत्राशी निगडीत आहेत. सुनिता यांना २००८मध्ये भारत सरकारकडून विज्ञान आणि अभियांत्रिक क्षेत्रातील कामगिरीसाठी पद्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले आहे. त्यांना आतापर्यंत नेव्ही कमेंडेशन मेडल (२), नेव्ही अँन्ड मरीन कॉर्प अचिव्हमेंट मेडल, ह्यूमॅनिटेरियन सर्विस मेडल अशा विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

अंतराळात जाणाऱ्या सुनीता या भारतीय वंशाच्या दुसऱ्या महिला असून अंतराळाची ओढ असणाऱ्या तरूणाईसाठी त्या एक प्रेरणास्रोत आहेत. दरम्यान, २०१२मध्ये सुनीता आंतरराष्ट्रीय इंटरनेशनल स्पेस स्टेशनच्या प्रवासादरम्यान अंतराळात ट्रायथलॉन पूर्ण करणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. यादरम्यान, त्यांनी वेट लिफ्टिंग मशीन वापरून पोहण्याची नक्कल केली आणि हार्नेसला बांधलेल्या ट्रेडमिलवर धावल्या होत्या.

सुनीता २००६ मध्ये STS-११६ मोहिमेसह अंतराळात गेल्या व एक्सपेडिशन १४मध्ये सामील झाल्या. त्यांनी चार अंतराळ चाल केल्या व २९ तास १७ मिनिटांचा वेळ घालवला, जो त्यावेळी महिलांमध्ये सर्वाधिक होता. २००७मध्ये त्या पृथ्वीवर परतल्या. १६ एप्रिल २००७ रोजी सुनीताने अंतराळातून पहिली मॅरेथॉन धावली. तिने बोस्टन मॅरेथॉनमध्ये भाग घेतला व ४ तास २४ मिनिटांत ती पूर्ण केली. सुनीता २०१२ मध्ये सोयुझ TMA-०५M मोहिमेसह अंतराळात गेल्या आणि एक्सपेडिशन ३२/एक्सपेडिशन ३३ मध्ये सहभागी झाल्या. त्या एक्सपेडिशन ३३ च्या कमांडर झाल्या. त्यांनी अंतराळात ट्रायथलॉनही पूर्ण केली. २०२४ मध्ये सुनीता बोईंग क्रू फ्लाइट टेस्टमध्ये सहभागी झाल्या, पण तांत्रिक समस्यांमुळे त्या आणि बॅरी विल्मोर ९ महिन्यांहून जास्त काळ आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर राहिल्या. त्या स्पेसएक्स क्रू-९ मोहिमेसह १८ मार्च २०२५ रोजी पृथ्वीवर परतल्या. सुनीता यांचे पती मायकेल जे. विल्यम्स हे टेक्सासमधील फेडरल मार्शल आहेत. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# दातांना खड्डे पडले, किड लागली? हे करा

नेहमी गोड खाल्ल्यामुळे, चहा-कॉफीचे अतिसेवन यामुळे दात जास्त प्रमाणात किडू लागतात. दातांमध्ये कॅव्हिटी झाल्यास बॅक्टेरिया दातांच्या नसांपर्यंत पोहोचून पू तयार होतो किंवा इन्फेक्शन होऊ शकते. जबड्याच्या खालच्या बाजूचे दात जास्त प्रमाणात किडतात. अनेकदा दातांच्या मध्यभागी खड्डासुद्धा तयार होतो. ज्याला कॅव्हिटीज असं म्हणतात. दातांमध्ये अन्नकण अडकून राहतात ते बराच काळ तसेच राहिल्यानं दातांना किड लागते. तोंडात वाढणारे बॅक्टेरिया व्यवस्थित स्वच्छ न झाल्यामुळे प्लाक आणि टार्टर तयार होते, ज्यामुळे कॅव्हिटीज होतात. किडलेले दात पुन्हा चांगले होण्यासाठी हजारो रुपये खर्च करावे लागतात. दात किडू नयेत यासाठी डॉक्टरांनी काही सोपे उपाय सांगितले आहेत.



प्रसिद्ध डॉक्टर इले फिलिप्स यांनी काही सोपे उपाय सांगितले आहे. या उपायांचा अवलंब करून तुम्ही दात किडण्याची समस्या टाळू शकता. आपली लाळ दातांसाठी नॅच्युरल प्रोटेक्शन आहे. जी दातांच्या कमकुवत भागांना पुन्हा मजबूत करत. ज्यामुळे दात सुरक्षित राहतात. जास्तवेळ तोंड कोरडं पडल्यामुळे कॅव्हिटीज जास्त वाढतातम ज्यामुळे पाणी अधिक प्यावं लागतं आणि तोंड कोरडं पडतं.

**जायलीटॉल च्युईंगम**

तुमचं तोंड कोरड पडत असेल तर जायलीटॉल शुगर फ्री च्युईंग गम फायदेशीर ठरतं. ही एक नॅच्युरल शुगर आहे जे बॅक्टेरियाज पचवू शकत नाही. याव्यतिरिक्त च्युईंग चावल्यानं लाळेचा स्त्राव वाढतो. दात धुवून स्वच्छ होतात आणि त्यात नवीन मिनरल्स जमा होतात.

**चांगली टुथपेस्ट निवडा**

कॅव्हिटीज रोखण्यासाठी आणि दातांना मजबूत ठेवण्यासाठी टुथपेस्ट, माऊथवॉशचा वापर खूप गरजेचा आहे. अशा माऊथवॉशची निवड करा, ज्यात सोडियम फ्लोराईड असेल. हा माऊथवॉश दातांच्या इनॅमेलवर चांगला परिणाम करतो. दिवसातून दोनदा वापर केल्यास कॅव्हिटीज टाळता येतात.

**खाण्यापिण्याची वेळ योग्य ठेवा**

कॅव्हिटीज फक्त गोड खाल्ल्यानं होत नाहीत तर सतत खाल्ल्यामुळे पण होते. जर तुम्ही सतत काही ना काही खात असाल तर दातांवर एसिड अटॅक होतो. ज्यामुळे दातांना दुरूस्त होण्यासाठी वेळ मिळत नाही. यासाठी खाण्यापिण्यात २ ते ३ तासांचं अंतर असायलाच हवं.

# कर्जत तालुक्यात २५९८ गौरींचे पूजन

## सुवासिनींनी लुटला ओवशाचा आनंद



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत १३४१, नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२४६ आणि माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीत ११ अशा एकूण २५९८ गौरींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. गणेश चतुर्थीला श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात येते. कोणी दीड दिवसांनी, कोणी पाच दिवसांनी, कोणी गौरींबरोबर, कोणी वामन नवमीला तर कोणी अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जन करतात. मात्र गौरींचे आगमन एकाच वेळी होते.

कोणी मूर्तीची गौर पूजतात तर कोणी आदल्या दिवशी पहाटे रानात जाऊन गौरी पूजनाच्या पूर्वसंध्येपर्यंत कचोऱ्याची फुले (गौरीची फुले) व तेरड्याच्या फुलांसकटच्या फांद्या आणतात. त्यानंतर महिला रात्रभर गाणी गात गौर सजवण्यात गुंततात. साडी नेसवून, मुखवटा आणि पुठ्ठ्याचे हात लावून खुर्चीवर गौर बसविली जाते. कुणाच्या उभ्या गौरी तर कुणाच्या नाचऱ्या गौरी असतात. त्यांचे पूजन मात्र सारख्याच पद्धतीने केले जाते.

दुपारी गौरीचे पूजन झाल्यावर घरातील सुवासिनी नटून-थटून सुपामध्ये पूजेचे साहित्य घेऊन गौरीचा ओवसा घेतात. विशेष म्हणजे नववधूने हा ओवसा घेतलाच पाहिजे, अशी परंपरा आहे. यावेळी त्यांनी उकडलेल्या पिठाचे दिवे लावून गौरींना ओवाळले. या सोहळ्याचा आनंद बहुतांश घरातील सुवासिनींनी घेतला. बऱ्याच ठिकाणी केवळ गणपतीची प्राणप्रतिष्ठा केली जाते, गौर आणली जात नाही. काहींची गौर एकच असते, अशा ठिकाणी सारे कुटुंबीय गौराई असलेल्या मोठ्या घरी एकत्र येऊन गौरीपूजनाचा आनंद लुटतात.

# पाली शहरात मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव

**सुधागड : रामप्रहर वृत्त**



पाली शहरात मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव नागरिकांच्या सुरक्षेसाठी चिंतेचा विषय बनला आहे. नुकताच समोर आलेल्या एका व्हिडिओमध्ये एका लहान मुलीला चार मोकाट कुत्र्यांनी चारही बाजूंनी घेरल्याचे दिसून येत आहे. या प्रकारामुळे लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

पाली शहरातील विविध भागांत मोकाट कुत्र्यांचे टोळके मोठ्या प्रमाणात फिरताना दिसत आहेत. रस्त्यावरून ये-जा करणारे नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांना या कुत्र्यांमुळे भीतीच्या वातावरणातून जावे लागत आहे. विशेषतः लहान मुले खेळण्यासाठी घराबाहेर पडतात, तसेच शाळा, क्लासेस आणि इतर कामांसाठी त्यांची नियमित ये-जा सुरू असते. सध्या सुट्टीचे दिवस असल्याने अनेक मुले घराबाहेर खेळण्यासाठी पडत आहेत. शाळा सुरू झाल्यानंतर सकाळी आणि दुपारच्या वेळेस विद्यार्थ्यांची रस्त्यावर वर्दळ वाढणार आहे. त्याचबरोबर क्लासेसमधून रात्रीच्या वेळी घरी परतणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो.

मोकाट कुत्र्यांचा प्रश्न वेळीच मार्गी न लावल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

# 'स्वच्छ सागर, सुरक्षित सागर' अंतर्गत नांदगाव समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता

**मुरूड : प्रतिनिधी**




'स्वच्छ सागर, सुरक्षित सागर' अंतर्गत प्राणीशास्त्र विभाग, जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा, जि. रायगड आणि ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव यांच्या वतीने नांदगावच्या समुद्रकिनाऱ्याची शुक्रवारी (दि. १८) सकाळी स्वच्छता करण्यात आली. 'समुद्र स्वच्छता ही आपली जबाबदारी, स्वच्छ किनारे, सुंदर पर्यावरण' आणि समृद्ध भविष्यासाठी समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता मोलाची आहे, या उद्देशाने स्वच्छता मोहीम राबविली. मोहिमेत विद्यार्थी, ग्रामस्थ, आजी-माजी सदस्य व कर्मचारी तसेच प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता.

# महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन



**तळा : प्रतिनिधी**

राज्यातील शेती क्षेत्रात महिलांचे मोठे योगदान असूनही त्यांना अधिकृत शेतकरी म्हणून ओळख आणि शासकीय योजनांचा लाभ मिळताना अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम २०२६ लागू केला आहे. या अधिनियमानुसार अठरा वर्षे व त्यावरील शेती व्यवसाय करणाऱ्या महिलांना "महिला शेतकरी" म्हणून मान्यता मिळणार आहे. स्वतःच्या जमिनीवर शेती करणाऱ्या महिलांसोबतच भाडेपट्ट्याने शेती करणाऱ्या, तसेच कृषी संलग्न कामे व व्यवसाय करणाऱ्या महिलांचाही यात समावेश आहे.

महिला शेतकरी प्रमाणपत्रामुळे महिलांना कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार आहे. ग्रामपंचायत क्षेत्रात ग्रामसभेच्या माध्यमातून प्रमाणपत्र प्रक्रिया राबविण्यात येणार असून नगरपंचायत क्षेत्रातही ही सुविधा उपलब्ध राहणार आहे. यासाठी गावातील सर्व पात्र महिलांनी कृषी विभागाच्या krishi.maharashtra.gov.in या वेबसाइटवर जाऊन अर्ज करणे आवश्यक आहे.

अर्ज करण्यासाठी आधार कार्ड व आधार संलग्न मोबाइल क्रमांक आवश्यक राहील. अधिक माहितीसाठी आपल्या गावाशी संबंधित सहाय्यक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, ग्रामविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी यांच्याकडून करण्यात येत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्रीमती पार्वती रामदास पाटील व श्री. रामभाऊ कमळ शिवकर** यांचेकडून आमचे अशील कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्रीमती पार्वती रामदास पाटील व श्री. रामभाऊ कमळ शिवकर** तसेच आमचे अशिल यांनी संमती दर्शवली आहे व या दोघांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत.

मिळकतीचे वर्णन-: **मौजे - पुनाडे** (553345)
**PU-ID : 18107486655** तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| खाते क्रमांक 1506 79/4 | 1 | 0.24.20 पो.ख. 0.00.00 एकूण - **0-24-20** | 5.20 |
| या एकूण विक्री क्षेत्राचे **0-24-20 गुंठे** | | | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क इ. संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्का बाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपतत्री पुराव्या सह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **14 दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतिनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक असणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक - 18/9/2026

**सही/-**
**ॲड. निलेश बाळासाहेब झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड - ४१०२०९
मो.क्र- : ९९२०४ ७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. प्रसाद नारायण गायकर, श्री. सुंदर रामचंद्र पवार, श्रीमती वनिता गुरुनाथ रसाळ आणि इतर** यांचेकडून आमचे अशील कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. प्रसाद नारायण गायकर, श्री. सुंदर रामचंद्र पवार, श्रीमती वनिता गुरुनाथ रसाळ आणि इतर** तसेच आमचे अशिल यांनी संमती दर्शवली आहे व या दोघांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत.

मिळकतीचे वर्णन-: **मौजे - पुनाडे** (553345)
**PU-ID : 2082105546** तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| खाते क्रमांक 1050 79/2/अ | 1 | 0.42.20 पो.ख. 0.00.00 एकूण - **0-42-20** | 1.12 |
| या एकूण विक्री क्षेत्राचे **0-42-20 गुंठे** | | | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क इ. संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्का बाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपतत्री पुराव्या सह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **14 दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतिनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक असणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक - 18/9/2026

**सही/-**
**ॲड. निलेश बाळासाहेब झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड - ४१०२०९
मो.क्र- : ९९२०४ ७५८०१

## PUBLIC NOTICE

NOTICE INVITING CLAIMS / OBJECTIONS IN RESPECT OF PROPOSED PURCHASE OF AGRICULTURAL LAND

This to inform the general public, bank lenders and other financial institutions about the impending sale of the property located **Survey number 55 hissa number 4 /A, Area 4.64.40, (hectares) Village Nadhal, Taluka Khalapur District Raigad.**
The aforementioned property is presently owned by
1) Mr. Sunil Kanhaiyalal Gundecha
2) Mr. Ramavtar Mishrilal Bhangadiya (deceased through heirs)
   a) Mrs. Lalita Ramavtar Bhangadiya
   b) Mr. Amitkumar Ramavtar Bhangadiya
   c) Mrs. Sonali Dinesh Maheshwari Nee Sonali Ramavtar Bhangadiya
   d) Mrs. Monali Rushabh Mundada Nee Monali Ramavtar Bhangadiya
3) Mr. Pramod Hansraj Gandhi

Land Particulars:
- Village: Nadhal, Taluka Khalapur, District Raigad
- ULPIN: 12488618921
- Revenue Account No.: 163 and 450
- The land is classified as agricultural land and is recorded in the names of the persons appearing in the relevant 7/12 Extract.

My client is desirous of purchasing the aforementioned property. Any person/bank lender/financial institution desires to oppose the impending sale in respect of the aforementioned property may do so within 30 days from the date of publication of this notice. You are requested to present your objections with adequate proof at the address mentioned herein below

**Sd/-**
**Advocate Paramvir Narula,**
sector-12, bungalow no.- 15 and 17,
road no.-11, New Panvel east 410206,
Mobile number-9820623888/8080767471.

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे - कर्नाळा, ता - पनवेल, जि - रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**- मिळकतीचे वर्णन-**
**मौजे : कर्नाळा, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| कर्नाळा | महमंद अरिफ शफीक अहमंद पटेल उर्फ मुहम्मद आरिफ शफीक अहमद पटेल राहणार - फ्लॅट नं. १०२, पहिला मजला, युनिक अपार्टमेंट, सिटीएस ९३, पटेल मोहल्ला, पनवेल, रायगड ४१०२०६ | ८/१/अ | ०.४३.४० ०.०८.३० **०.५१.७०** | १.८१ |
| | | **एकुण** | **०.५१.७०** | |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. सरिता महेन्द्र साखरे**

पत्ता : बंन्सल असोसिएट्स, पहिला मजला, प्लॉट नं. ३०, सेक्टर १/२, रोड नं. ४, नवीन पनवेल, बालाजी मंदिराच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-कर्नाळा, ता.- पनवेल, जि.- रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

**- मिळकतीचे वर्णन-**
**मौजे : कर्नाळा, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| कर्नाळा | मोहम्मद वासीक मोहम्मद अरिफ पटेल उर्फ मुहम्मद वासीक मुहम्मद आरिफ पटेल राहणार - फ्लॅट नं. १०२, पहिला मजला, युनिक अपार्टमेंट, सिटीएस ९३, पटेल मोहल्ला, पनवेल, रायगड ४१०२०६ | १८ | ०.१४.०० ०.००.०० ०.१४.०० | ०.२५ |
| | | **एकुण** | **०.१४.००** | |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. सरिता महेन्द्र साखरे**

पत्ता : बंन्सल असोसिएट्स, पहिला मजला, प्लॉट नं. ३०, सेक्टर १/२, रोड नं. ४, नवीन पनवेल, बालाजी मंदिराच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. अनंत चांगु पाटील व इतर** यांच्याकडून आमचे अशील कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. अनंत चांगु पाटील व इतर** तसेच आमचे अशिल यांनी संमती दर्शवली आहे व या दोघांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत.

मिळकतीचे वर्णन-: **मौजे - विंधणे** (553324)
**PU-ID : 22193642022** तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| खाते क्रमांक 111 160/5 | 1 | 0.41.90 पो.ख. 0.13.70 एकूण - **0-55-60** | 2.26 |
| या एकूण विक्री क्षेत्राचे **0-55-60 गुंठे** | | | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क इ. संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्का बाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपतत्री पुराव्या सह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **14 दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतिनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक असणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक - 18/9/2026

**सही/-**
**ॲड. निलेश बाळासाहेब झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड - ४१०२०९
मो.क्र- : ९९२०४ ७५८०१

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील फरशीपाडा, आडिवली, रोहिंजण व पेणधर येथील शाळांकरीता तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन घेणेबाबत इच्छुक व्यक्ती / संस्था यांचेमार्फत अर्ज मागविणेत येत आहेत. जागा मागणीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | ठिकाण | क्षेत्रफळ (चौ. फुट) |
|---|---|---|
| १) | फरशीपाडा | १००० |
| २) | आडिवली | १००० |
| ३) | रोहिंजण | १५०० |
| ४) | पेणधर | ५००० |

इच्छुक व्यक्ती / संस्था / जागामालक यांनी जागेचे आवश्यक कागदपत्रे, क्षेत्रफळ, नकाशे यासहित अर्ज दिनांक २५/०९/२०२६ रोजी सायं. ४:०० वाजेपर्यंत pmcmalmatta2018@gmail.com या ईमेलवर अर्ज जमा करावेत. सदर मुदतीत प्राप्त न होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- १८/०९/२०२६

पमपा/माव्य/९९२६/प्र.क्र. ५३/४४९/२०२६

**सही/-**
**उपायुक्त (मालमत्ता)**
पनवेल महानगरपालिका

## जाहीर प्रगटन

तमाम जनतेस विशेषतः घोट गाव ता. पनवेल जि. रायगड ( पनवेल महानगर पालिका, नवी मुंबई परिसर) येथील जनतेस जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, १ बीएचके सदनिका क्र. ई ३.१०२.१ मजला अरिहंत अंशुला, सर्वे क्र. १ हिस्सा क्र. १ ए, सर्वे क्र. ६७ हिस्सा क्र. १ ए, १ बी २, ३,४ सर्वे क्र. ६८ हिस्सा क्र. १ व २, ३ बी, ४, ५ व ६ मौजे घोट ता. पनवेल जि. रायगड येथील क्षेत्र ३७.५३ चौ. मीटर कारपेट ज्या मिळकतीचे मुळ मालक फैझान इब्राहीम मुलतानी असुन त्यांनी सदर मिळकतीवर बँक ऑफ बडोदा शाखा, सी. बी. डी बेलापुर यांचे कडुन कर्ज घेतलेले असून सदर कर्ज थकीत गेलेले आहे. बँक ऑफ बडोदा यांनी कर्ज वसुली बाबत सर्व कार्यवाही करुन रितसर वरील मिळकतीचा लिलाव करणे बाबतची कार्यवाही केली. त्यानुसार आमचे आशिलांनी लिलावामध्ये सहभाग घेऊन वर वर्णनीत मिळकत दिनांक २६/०८/२०२६ रोजी घेतलेली आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचा आक्षेप अथवा उजर असेल किंवा सदर मिळकतीमध्ये कोणाचे हितसंबंध गुंतलेले असतील किंवा सदर मिळकत गहान, दान, बक्षीस खरेदी विक्री अथवा अन्य मार्गाने काही हितसंबंध असतील तर सदरचे जाहीर प्रगटन झाल्यापासुन १५ दिवसांचे आत आमचे आशिलाकडे किंवा आमच्या कार्यालयाकडे आक्षेप नोंदवावा त्यानंतर आमचे आशिल आक्षेप कालावधी संपल्यानंतर बँक ऑफ बडोदा शाखा सी. बी. डी बेलापुर यांचेकडुन कायदेशीर खरेदी खत करुन घेणार आहेत. मुदतीच्या नंतर कोणाचा काही आक्षेप आला तर तो आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही. सबब हे जाहीर प्रगटन कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन दिले असे.

दिनांक : १५/०९/२०२६

**जाहीर प्रगटन देणार**
**सही/-**
**विनोद आप्पाराव जाधव**
रा. घोट ता. पनवेल जि. रायगड
मो. ७५०६८६८६८०

**तर्फे,**
**सही/-**
**ॲड. एच. एस. मुरगे**
जिल्हा व सत्र न्यायालय कळंब
जि. धाराशिव
मो. ९४२१३५२०६५












पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर व  महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी परिसरात विराजमान झालेल्या गणरायांचे मनोभावे दर्शन घेतले. त्यांनी सर्वांच्या सुख-समृद्धी, आरोग्य आणि मंगलमय जीवनासाठी बाप्पाच्या चरणी प्रार्थना केली.













मनोहर धोत्रे, मोहोपाडा


काशिनाथ नारायण पाटील, दिघोडे, उरण



साहेबराव जाधव, नवीन पनवेल


संदीप बळीराम ठाकूर, दिघोडे

## बल्लाळेश्वराच्या साक्षीने उजळला

# ‘आशीर्वादाचा दिवा’!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्रसेवेला पालीत नमन

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभर सुरू असलेल्या सेवा सप्ताहाच्या अनुषंगाने पाली येथील श्री क्षेत्र बल्लाळेश्वर मंदिरात गुरुवारी (दि. १७ सप्टेंबर) ‘आशीर्वादाचा दिवा’ हा विशेष कार्यक्रम भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. दीपप्रज्वलनाच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्रसेवेप्रती नमन करण्यात आले. तसेच त्यांच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करत विकसित भारताच्या संकल्पासाठी कार्यरत राहण्याचा निर्धार करण्यात आला.



या कार्यक्रमास भाजपा दक्षिण रायगड जिल्हा महामंत्री तथा जिल्हा परिषद सभापती वैकुंठ पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. भाजपा दक्षिण रायगड जिल्हा नेते व कार्यक्रमाचे जिल्हास्तरीय संयोजक प्रकाश देसाई, आलाप मेहता, पाली नगरपंचायतीचे नगराध्यक्ष तथा तालुकास्तरीय संयोजक पराग मेहता, माजी उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, शहराध्यक्ष तथा सहसंयोजक सुशील शिंदे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष प्रणाली शेठ, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सुजित बारस्कर, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष जितेंद्र अरविंद गद्रे, ॲड. आरती गुप्ता, शेखर राऊत, भाऊ मोहिते, निलेश खोडागळे, निकेश सातंबेकर, हर्षल खंडागळे यांच्यासह पाली शहरातील ज्येष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रकाश देसाई यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या विकासाला आणि जनसेवेला प्राधान्य दिले जात असल्याचे सांगितले. सेवा सप्ताहाच्या माध्यमातून विविध सेवाभावी उपक्रम राबविले जात असून, ‘आशीर्वादाचा दिवा’ प्रज्वलित करून राष्ट्रसेवेच्या कार्याला नमन करण्याची संधी मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने सेवाभावाने कार्यरत राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

वैकुंठ पाटील यांनीही सेवा सप्ताहाचे महत्त्व अधोरेखित करत ‘आशीर्वादाचा दिवा’ हा राष्ट्रसेवेच्या संकल्पाला बळ देणारा उपक्रम असल्याचे सांगितले. विकसित भारत घडविण्याच्या संकल्पात प्रत्येक कार्यकर्त्याने आपले योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमादरम्यान पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सामूहिक दीपप्रज्वलन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करत समाजसेवा आणि राष्ट्रहिताच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, सुधागड तालुक्यातील परळी-जांभुळपाडा येथेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त ‘आशीर्वादाचा दिवा’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# कर्जत-कल्याण राज्यमार्गावर मोकाट जनावरांचा वावर

## अपघाताला निमंत्रण

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत - कल्याण मार्गावर उमरोली ग्रामपंचायत हद्दीमधील डिकसळ नाक्यावर दिवसा तसेच रात्रीच्या वेळी मोकाट जनावरे रस्त्यावर ठाण मांडून बसत असल्याने वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

रस्त्याच्या मधोमध मोठ्या संख्येने जनावरे उभी राहत असल्याने अपघाताला निमंत्रण देत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी अंधारात अचानक समोर येणारी जनावरे वाहनचालकांच्या लक्षात उशिरा येतात. त्यामुळे दुचाकीस्वारांना अचानक ब्रेक लावणे किंवा वाहन वळविणे भाग पडते. यातून गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मोकाट जनावरांमुळे यापूर्वीही अपघात घडले आहेत. रस्त्यावर फिरणाऱ्या या जनावरांमुळे वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत असून, वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे संबंधित उमरोली ग्रामपंचायतीने तातडीने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करून ही समस्या कायमस्वरूपी सोडवावी. अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. तसेच जनावरे रस्त्यावर मोकाट सोडणाऱ्या मालकांचा शोध घेऊन त्यांच्यावर नियमानुसार कायदेशीर कारवाई करावी, जेणेकरून भविष्यात संभाव्य अपघात टाळता येतील, अशी मागणीही करण्यात येत आहे.

“

**कर्जत - कल्याण मार्गावर मोकाट जनावरांचा वाढता वावर हा वाहनचालकांच्या जीवितासाठी धोकादायक ठरत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी अचानक जनावरे समोर आल्याने अपघात होण्याची शक्यता असते. प्रशासन व संबंधित ग्रामपंचायतीने याची गांभीर्याने दखल घेऊन मोकाट जनावरांचा तातडीने बंदोबस्त करावा. तसेच जनावरे रस्त्यावर सोडणाऱ्या मालकांवर कठोर कारवाई करावी.**

- ॲड. उत्तम गायकवाड

## महिला शेतकऱ्यांना मिळणार आता स्वतंत्र ओळख

**अलिबाग : प्रतिनिधी**

शेती आणि शेतीपूरक व्यवसायात प्रत्यक्ष काम करणाऱ्या महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६’ लागू केला आहे. महिला शेतकऱ्यांना शासकीय कृषी योजना, कर्ज, विमा आणि विविध कृषी सेवांचा लाभ मिळवून देण्यासाठी या कायद्यात तरतुदी करण्यात आल्या आहेत.


या कायद्याचे वैशिष्ट्य म्हणजे महिलेच्या नावावर जमीन असणे ही शेतकरी म्हणून ओळख मिळण्यासाठी अनिवार्य अट राहणार नाही. प्रत्यक्ष शेती करणाऱ्या किंवा शेतीशी संबंधित कामात सहभागी असलेल्या महिलांना महिला शेतकरी म्हणून प्रमाणपत्र मिळू शकते. भाडेतत्त्वावर शेती करणाऱ्या तसेच भूमिहीन महिला शेतकरी आणि शेतमजुरांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळख मिळावी यासाठी राज्याच्या कृषी विभागाने महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन पोर्टल सुरू केले आहे. पात्र महिलांना या माध्यमातून अर्ज करून प्रमाणपत्र मिळवता येणार आहे.

# अष्टमी रेल्वे फाटकामुळे प्रवाशांना बसावे लागते ताटकळत

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील अष्टमी येथे रेल्वे क्रॉसिंग वर उड्डाणपुलाचे काम चालू आहे. उड्डाणपूलचे काम लवकर पूर्ण होत नसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. कोकण व मध्य रेल्वेच्या रेल्वे गाड्या जात असल्याने या मार्गावर सातत्याने रेल्वे फाटक पडत असल्याने प्रवाशांना त्याचा त्रास होत आहे.गेली साडेचार वर्ष अष्टमी रेल्वे फाटक वरील उड्डाणपुलाचे काम चालू आहे. काम धिम्या गतीने चालू असल्याने उड्डाण पुलाचे काम कधी पूर्ण होणार असा सवाल प्रवासही वर्गातून विचारला जात आहे.



कोकण रेल्वे मार्गावर व मध्य रेल्वे मार्गावर हंगामी सह नियमित रेल्वे गाड्या चालत असल्याने अष्टमी रेल्वे फाटक सातत्याने बंद राहत आहे. रेल्वे फाटका पलीकडील मेढा, नागोठणे, धामणसई या परिसरातील नागरिक नोकरी व्यवसाय विविध शासकीय कामासाठी, व शाळेत विद्यार्थी तालुक्याचे ठिकाण असलेल्या रोहाकडे सातत्याने येत असतात. पुणे, मुंबई, अलिबाग आदी मोठ्या शहराकडे जाणाऱ्या नागरिकांना याच मार्गातून प्रवास करावा लागत असतो.

परंतु रेल्वे फाटक पडत असल्याने या मार्गावर असणाऱ्या सर्व प्रवाशांना फटकामुळे त्रास सहन करावा लागतो. सगळ्यात जास्त त्रास धाटाव औद्योगिक क्षेत्रात, नागोठणे येथील रिलायन्स व औद्योगिक क्षेत्रात कामासाठी जाणाऱ्या कामगारांना त्रास सहन करावा लागत असल्याने कधी कधी त्यांची रजाही लागत आहे.दुसरीकडे रिक्षा व्यवसायिक व मिनीडोअर व्यवसायिक यांनाही सतत पडत असलेल्या फाटकामुळे आर्थिक त्रासही सहन करावा लागतो.

अष्टमी येथे रेल्वे क्रॉसिंगमुळे नागरिकांना त्रास होत होता. त्यामुळे या ठिकाणी पर्यायी मार्गाची व्यवस्था करावी अशी मागणी नागरिकांची होती. त्यामुळे खा.सुनील तटकरे यांच्या प्रयत्नातून उड्डाणपूल मंजूर करण्यात आले. राज्य सरकार व केंद्र सरकारच्या माध्यमातून नागोठणे रोहा रेल्वे क्रॉसिंग ५७ ( अष्टमी ) येथे खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते २०२२ ला उड्डाणपुलाचे भूमिपूजन करण्यात आले.


२०२२ ला चालू झालेल्या उड्डाणपुलाचे काम धीम्या गतीने चालू आहे. हे काम कधी पूर्ण होणार असा प्रश्न प्रवासी वर्गातून विचारला जात आहे. आता नेहमीच रेल्वे गाड्या सह हंगामी व विशेष गाड्या वाढल्याने हे रेल्वे फाटक सातत्याने पडत आहे. त्यामुळे या मार्गावर व्यवसाय निमित्ताने व अन्य कारणास्तव येणाऱ्या प्रवाशांना या फटका चा त्रास सहन करावा लागत आहे. रेल्वे फाटक उघडेपर्यंत ताटकळत बसावे लागत आहे.

दुसरे महत्त्वाचे म्हणजे सर्वाधिक जास्त त्रास गणेशोत्सव, दिवाळीमध्ये प्रवाशांना होताना दिसत आहे. दिवाळी विशेष गाड्या व गणपती विशेष गाड्या सोडत असल्याने हे फाटक सातत्याने पडत आहे. उड्डाणपुलाचे काम चालू असल्याने बाजूला सर्विस रोड काढण्यात आले आहे. परंतु सर्विस रोडवर काही ठिकाणी खड्डे असल्याने सातत्याने अपघात होताना दिसत आहे. खा.सुनील तटकरे, यांनी या लक्ष देऊन या उड्डाणपुलाचे काम लवकरात लवकर कसे होईल याकडे लक्ष दिल्यास नागरिकांना होणाऱ्या त्रासा पासून दिलासा मिळेल.

# पिंगळसई येथील एक गाव, एक कुटुंब, एक गणपती

**रोहा : प्रतिनिधी**

सर्वत्र एक गाव एक गणेश उत्सव ही परंपरा राबवीत असताना रोहा तालुक्यातील पिंगळसई येथे एक गाव, एक कुटुंब, एक गणपती गेली शेकडो वर्ष देशमुख तरुण मंडळाच्यावतीने हा उत्सव उत्साहात साजरा करण्यात येत असतो.




छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या अवचितगडाच्या पायथ्याशी व बारमाही वाहणाऱ्या कुंडलिका नदीच्या तीरावर वसलेले पिंगळसई हे गाव. पिंगळसई गावातील देशमुख कुटुंबियांनी आजही गणेश उत्सवाची शेकडो वर्षाची परंपरा जपली आहे. दरवर्षी उत्साही वातावरणात, देशमुख कुटुंबांच्या सहकार्याने नेट नेटकेपणाने देशमुख तरुण मंडळ गणेश उत्सव साजरा करत असतात. साडेतीनशे वर्षापेक्षा जास्त वर्षापासून ही परंपरा चालू असल्याचे ग्रामस्थांच्यावतीने बोलले जाते

रोहा तालुका हा सांस्कृतिक वारसा जपणारा तालुका म्हणुन ओळखला जातो. तालुक्यात पूर्वीपासून विविध समाजातील, जातीतील लोकांनी आपली परंपरा जपली आहे. सण, उत्सव, पारंपरिक खेळ गुण्यागोविंदाने साजरा करतात. तालुक्यात प्रत्येक गावाने आपले वैशिष्टय आज पर्यंत जोपासले आहे. सामाजिक सलोखा राखण्याचे काम रोहा तालुक्याने केले आहे. रोहा तालुक्यातील काही प्रतिष्ठीत गावे, भजन मंडळे, नाच मंडळे, विविध संस्था, सामजिक संघटना, विविध मंडळे यांचे योगदान मोठे आहे. यांच्यावतीने गावात, परिसरात व तालुक्यात अनेक सण उत्सव साजरे केले जातात. या उत्सवातून एकीचे बळ काय असते. गणेश उत्सव, नवरात्र उत्सव, शिवजयंती यासह अन्य उत्सवाच्या काळात दिसून येते. रोहा तालुक्यातील पिंगळसई येथील देशमुख तरूण मंडळ विविध उत्सव पिंगळसई गावात गुण्यागोविंदाने साजरा करत असतो. अध्यात्माचा वारसा या गावाला लाभला आहे. वारकऱ्यांचा संगम ही या गावात सप्ताह निमित्ताने पहावयास मिळतो.

रोहा तालुक्यात अनेक गणेशोत्सव मंडळे जुनी आहेत. यातीलच देशमुख तरुण मंडळ हा रोह्यातील प्रसिद्ध गणेशोत्सव मंडळ आहे. आज कोकणात कुटुंब पद्धती विखुरली जात असताना त्यांचे सण उत्सवही विखुरले गेले आहेत. परंतु रोहा तालुक्यातील एकच कुटुंब एकच गणेश उत्सव गेली कित्येक वर्ष पिंगळसई गावातील देशमुख तरूण मंडळाने जोपासला आहे. नाती व स्नेहभाव जोपासणारा तरूण मंडळाच्या गणेशोत्सवाची ओळख आहे. आज राज्याच्या कानाकोपऱ्यातुन व राज्याच्या बाहेर गेलेले लोक या उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येताना दिसतात. त्यानिमित्ताने गावात कामानिमित्ताने बाहेर गेले लोकांशी स्नेहभाव द्विगणित होत आहे. यावर्षीही मोठ्या प्रमाणात नोकरी निमित्ताने व व्यवसाय निमित्ताने बाहेर गेलेले ग्रामस्थ आपल्या या उत्सवासाठी आवर्जून आलेले दिसून येत आहेत.

आजच्या काळातही एकाच छताखाली एकच उत्सव संख्येने मोठे असलेले देशमुख परिवार साजरा करित असतो. हा उत्तम आदर्श रायगड जिल्ह्यात पाहावयास मिळते. याचे श्रेय परिवारातील जुन्या जाणत्यांसह नव्या दमातील तरूणांकडे जाते, अध्यात्मिक योगेश्वरी मातेचा वरदहस्त असलेले पिंगळसई हे गाव असून या गावात मोठ्या प्रमाणात देशमुख कुटुंब राहतात. या कुटुबाचे सर्व उत्सव एकत्रीत एकाच ठिकाणी होत असतात. त्यातीलच गणेशोत्सव परंपरा गेली कित्येक वर्षापासुन चालत आलेली आहे. एकाच कुटुंबातील एक गाव एक गणपती उत्सव जपत आहे. कुटुंब मोठे झाले कि त्याचा विस्तार वाढतो. त्यांचे सण, उत्सव अनेक कार्यक्रमात विभक्तपणा येतो. परंतु गेली शेकडो वर्ष पिंगळसई गावाने एक कुटुंब एक गणपती हा उत्सव यशस्वीरित्या पार पाडला आहे. या उत्सवात सर्व कुटुंब व त्यातील सदस्य हा उत्सव आपला या भावनेतुन उत्सव यशस्वी करण्यासाठी झटत असतात. यावर्षी पूजा, आरती, आध्यात्मिक कार्यक्रम आजही घेण्यात येत आहे. यावर्षीही विविध धार्मिक अध्यात्मिक कार्यक्रम घेण्यात येत आहेत.

आपल्या गणरायाचे दरवर्षी रोहा शहरातून वाजत गाजत गुलालाचे उधळण करीत गावातील देशमुख कुटुंबीयांचे प्रमुख ज्येष्ठ कार्यकर्ते, तरूण मंडळाचे कार्यकर्ते व लहान मुले मिरवणुक काढीत गावात आणतात. रोहा शहरातून ही भव्य मिरवणूक, पाश्यमात्य संगीत, ढोल ताशाच्या तालावर व गुलाल उधळीत काढीत असतात. विविध वेशभूषा परिधान करून आपल्या बाप्पाची मिरवणूक शांततेत काढतात. विधीवत पुजा करून शांततेत व आनंदमय वातावरणात गणरायाचे विराजमान करण्यात येते. गेली कित्येक वर्ष एकाच ठिकाणी देशमुख तरूण मंडळाचे उत्सवामागील काही पिढ्यांपासून आजपर्यंत सार्वजनिक कार्यक्रम होत असतात. त्याच देशमुख तरुण मंडळ पारंपरिक पद्धतीने हा ठिकाणी गणरायाची स्थापना करण्यात येते. आरतीसह अन्य आध्यात्मीक कार्यक्रमास गावातील देशमुख परिवारातील सर्वच अबालवृद्धांपासून ज्येष्ठांसह महीला सदस्य उपस्थित राहतात.




## गणेशोत्सवात चिबूड फळाला वाढती मागणी

**पाली : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाचे आगमन होताच बाजारपेठांमध्ये विविध प्रकारच्या पूजा साहित्यासोबतच रानफळांची मोठी आवक सुरू झाली आहे. या दिवसांत श्री गणेशाच्या पूजनासाठी आणि नैवेद्यासाठी चिबूड या फळाला भाविकांकडून विशेष पसंती दिली जात आहे. बाजारात चिबूड मागणी प्रचंड वाढल्याने ग्रामीण भागातील स्थानिकांना आणि महिला विक्रेत्यांना उत्तम रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

पिकेलेले 'चिबूड' हे फळ दिसायला पिवळ्या पांढऱ्या रंगाचे असून त्याला एक विशिष्ट मंद सुवास आणि गोडवा असतो. गणेशोत्सवाच्या काळात बाप्पाला चिबूड अर्पण करण्याची परंपरा आहे. शिवाय प्रसादांच्या फळांमध्ये देखील याचा वापर करतात. या फळाची खरेदी करण्यासाठी बाजारात ग्राहकांची मोठी गर्दी होत आहे. सध्या हे फळ स्वस्त देखील मिळत असून छोट्या आकाराचे फळ वीस रुपयांना मिळत आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी व महिला हे फळ थेट शेतातून किंवा परसबागेत पिकवून तालुक्यांच्या ठिकाणी विक्रीसाठी आणतात. सणासुदीच्या काळात या फळांच्या विक्रीतून स्थानिकांना उत्तम आर्थिक हातभार लागत असून त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसत आहे.



**अलिबागः आमदार महेंद्र दळवी यांच्या निवासस्थानी बाप्पाचे दर्शन घेतांना शिवसेनेचे मुरुड तालुका बांधकाम विभाग प्रमुख दिनेश मिणमीने,खारआंबोली गणपती मूर्तीकार संदिप मोकल ,विजय चोगले व स्वतः आमदार महेंद्र दळवी आहेत. अलिबागः आमदार महेंद्र दळवी यांच्या निवासस्थानी बाप्पाचे दर्शन घेतांना शिवसेनेचे मुरुड तालुका बांधकाम विभाग प्रमुख दिनेश मिणमीने,खारआंबोली गणपती मूर्तीकार संदिप मोकल ,विजय चोगले व स्वतः आमदार महेंद्र दळवी आहेत.** (छाया : संजय करडे)

# १०० वर्षांची गणेशोत्सव परंपरा

## स्वच्छ ऊर्जेच्या संदेशासह गणेशोत्सव



**पनवेल : प्रतिनिधी**

गेल्या शंभर वर्षांहून अधिक काळापासून टाटा पॉवरच्या खोपोली जलविद्युत प्रकल्पाच्या ऐतिहासिक आवारात गणेशोत्सवाची परंपरा जपली जात आहे. यंदाही या परंपरेला आधुनिक स्वच्छ ऊर्जा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश जोडत टाटा पॉवरच्या कर्मचाऱ्यांनी आकर्षक देखावा साकारला.

बाप्पाच्या मूर्तीभोवती साकारलेल्या लघु-दृश्यात हिरवेगार डोंगर, पवनचया, केबल-स्टे पुलाची प्रतिकृती, सौर पॅनेल, उपजीविका केंद्र आणि ईव्ही चार्जिंग स्टेशन अशा विविध संकल्पनांचा समावेश करण्यात आला. प्रवेशद्वारावर ‘Green Energy for a Better Tomorrow’ हा संदेश देणारी स्वागत कमान उभारण्यात आली होती. पारंपरिक संस्कृती आणि आधुनिक हरित ऊर्जेचा सुरेख संगम या देखाव्यातून साधण्यात आला.

दरम्यान, टाटा पॉवरच्या भिरा जलविद्युत प्रकल्पातही जवळपास शतकभरापासून गणेशोत्सव श्रद्धा आणि उत्साहाने साजरा केला जात आहे. या परंपरेला शंभर वर्षे पूर्ण होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू असताना यंदा कर्मचाऱ्यांनी हाताने साकारलेली दगडी गुहा विशेष आकर्षण ठरली. खडकाळ पोत असलेल्या या कमानीवर लटकणाऱ्या वेली आणि उबदार लाल प्रकाशयोजनेने वातावरणात वेगळेच सौंदर्य निर्माण केले होते. या गुहेत फुलांनी सजविलेल्या गणरायाची मनोहारी मूर्ती विराजमान करण्यात आली होती.





महापौर निवासस्थानी विराजमान श्री गणरायाची आरती
MSF जवान व रायगड सुरक्षा रक्षक यांच्या हस्ते भक्तिभावाने संपन्न झाली.




अरुण नाईक, टाकीगाव, उरण



अनिल भाऊराव देशमुख, खारकोपर, ता. पनवेल



उत्तम कोळी आणि परिवार, मोरावे से.३, उलवे



ठाकूर परिवार, मिठागर,
पोस्ट सावली, तालुका मुरुड



हेमंत ठाकूर, गव्हाण







पनवेल : महाराष्ट्राच्या पर्यावरण, पशुसंवर्धन व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या रामटेक निवासस्थानी जाऊन पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका बायजा बबन बारगजे व भाजपचे भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांनी सहकुटुंब जाऊन दर्शन घेतले. यावेळी श्री संत वामन भाऊ व भगवान बाबा मंडळाचे सर्व पदाधिकारी, विनायक मुंडे, दिलीप नाकाडे, हनुमंत गीते, विश्वास वारे, महेश बारगजे, हरिहर केंद्रे, नामदेव मुंडे, आजिनाथ जायभाये, कृष्णा गर्जे, सत्यभामा जायभाये आदी उपस्थित होते.



नवीन पनवेल येथील के. आ. बांठीया विद्यालयातील चिमुकला विद्यार्थी यथार्थ रामनाथ घोसाळकर याने साकारलेली त्याच्या कल्पकतेतील गणेशमूर्ती.




पनवेल शहर पोलीस ठाणे



सुनील व सौ. सायली नलावडे, माथाडी कॉलनी, विचुंबे



पंकज काळे, पनवेल










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com